# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा माळा, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६४७४२११ विस्तारीत - ३६४२ दूरभाष : २६५८ १५१६
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com


**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/

## वृत्तपत्र निवेदन

**चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील संचांच्या बिघाडाबाबत काही प्रसारमाध्यमांतून वृत्तप्रसारण सुरु आहे, या पार्श्वभूमीवर महानिर्मितीतर्फे खालीलप्रमाणे निवेदन देण्यात येत आहे.**

**(मुंबई, दि. १३/०२/२०१४) :** महानिर्मितीच्या एकूण २३४० मेगावॅट क्षमतेच्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील संचांबाबतची सध्याची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :

१) बंद पडलेल्या संच क्र. ७ (५०० मेगावॅट क्षमता) मधील बिघाड दुरुस्त करण्यात आलेला असून या संचातून वीजनिर्मिती सध्या सुरु आहे.

२) संच क्र. ६ (५०० मेगावॅट क्षमता) बॉयलर ट्युब गळतीमुळे बंद करण्यात आला असून आज रात्रीपर्यंत त्याचे दुरुस्तीचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

३) संच क्र. ५ (५०० मेगावॅट क्षमता) चे कंडेन्सर ट्युब बदलण्याचे काम नुकतेच पूर्ण झालेले असून त्याचा बॉयलर सुरु करण्यात आलेला आहे. १-२ दिवसांत या संचातून वीजनिर्मिती सुरु होणे अपेक्षित आहे.

४) संच क्र. २ (२१० मेगावॅट क्षमता) हा वार्षिक देखभालीच्या कामासाठी पूर्वनियोजनाप्रमाणे बंद असून तत्संबंधित देखभाल दुरुस्तीची कामे सुरु आहेत. हे काम १८ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अशा प्रकारे उद्यापर्यंत या औष्णिक विद्युत केंद्रातील वीजनिर्मिती पूर्वपदावर येणे अपेक्षित आहे.

तरी सदर खुलाश्याची वृत्तप्रसारणासाठी त्वरीत नोंद घ्यावी, ही विनंती.

---

दिनांक : १३/०२/२०१४.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक / वृत्तवाहिनी

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत / वाहिनीवर प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**